# कृषि पणन विषयक बातम्या : एप्रिल 2024

Sakal, Dt. 25/04/2024

## वाघोलीतील आंबाप्रेमींसाठी पर्वणी

### शेतकऱ्यांकडून ग्राहकांना थेट मिळणार हापूस आंबा

**वाघोली, ता. २४ :** वाघोलीतील बाजार तळ मैदानात शेतकरी ते थेट ग्राहक आंबा महोत्सव आजपासून (ता. २५) सुरू होत आहे. हा महोत्सव १० मेपर्यंत सुरू राहणार असून महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व पुणे कृषी उत्पन्न बाजार समिती संयुक्तपणे हा महोत्सव भरवत आहेत.

यामुळे नागरिकांना कोकणचा हापूस आंबा चाखता येणार असून त्यांची फसवणूक होणार नाही, अशी माहिती पुणे जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामकृष्ण सातव यांनी दिली.

सकाळी नऊ ते रात्री नऊ वाजेपर्यंत कोकणातील २० शेतकरी वाघोलीत येऊन थेट विक्री करणार आहेत. बाजारात रत्नागिरी हापूस आंबा म्हणून नागरिकांना कर्नाटक हापूस आंब्याची मोठ्या प्रमाणावर विक्री केली जाते. नागरिकांना दोन्ही आंब्यांतील फरक कळत नसल्याने ते फसतात. या आंबा महोत्सवामुळे नागरिकांना रास्त दरात रत्नागिरी हापूस आंबा मिळेल.

या आंबा महोत्सवाबरोबरच तृणधान्य महोत्सवही भरविण्यात येणार असून तेही नागरिकांना थेट शेतकऱ्यांकडून मिळणार आहे. नागरिकांनी या महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही सातव यांनी केले आहे.

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM
बुधवार, २४ एप्रिल २०२४

# आंबा निर्यातीत ५० टक्क्यांची घट

## इस्रायल-पॅलेस्टाईन युद्धाचा परिणाम; हवाई वाहतुकीवर ताण

**दत्ता जाधव, लोकसत्ता**

**पुणे :** इस्रायल-पॅलेस्टाईन युद्धामुळे समुद्रमार्गे होणारी निर्यात बंद आहे. त्यामुळे हवाई वाहतुकीवर मोठा ताण आला आहे. वाढीव दरानेही आंबा निर्यातीसाठी निर्यातदारांना कोटा मिळत नसल्यामुळे आंबा निर्यात सुमारे ५० टक्क्यांनी घटली आहे.

इस्रायल-पॅलेस्टाईन युद्धामुळे समुद्रमार्गे होणारी निर्यात बंद आहे. त्यामुळे सर्व प्रकारची निर्यात हवाईमार्गे सुरू आहे. परिणामी हवाई वाहतुकीवर मोठा ताण आला आहे. हवाई वाहतूक दरात सरासरी २५ टक्क्यांनी वाढ झाली. वाढीव दरानेही आंबा निर्यात करण्यासाठी निर्यातदार तयार आहेत. पण हवाई वाहतूक कंपन्यांकडून आंबा निर्यातीसाठी अपेक्षित कोटा मिळत नाही, अशी माहिती पणन मंडळातील अधिकाऱ्यांनी दिली.



> इस्रायल-पॅलेस्टाईन युद्धामुळे हवाई वाहतूक दरात २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. वाढीव दरानेही निर्यातदार आंबा निर्यातीस तयार आहेत. पण, हवाई वाहतूक कंपन्यांकडून आंब्याला निर्यात कोटा मिळत नाही. यंदा हापूसचे उत्पादन चांगले आहे. निर्यातीला युद्धामुळे मोठा फटका बसत आहे. दोन शेतकरी उत्पादक कंपन्या आंबा निर्यात करीत आहेत. - **संजय कदम**, व्यवस्थापकीय संचालक, राज्य कृषी पणन मंडळ

### मुंबईतून ६२५ टन आंबा परदेशात

**वाशी येथील निर्यात सुविधा केंद्रावरून २३ एप्रिलअखेर सुमारे ६२५ टन आंब्याची निर्यात झाली. ब्रिटनला ४००, अमेरिकेला २००, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंडला प्रत्येकी १५ आणि जपानला तीन टन आंब्याची निर्यात झाली असून अमेरिकेला २८ जूनपर्यंत सुरू राहणार आहे. दक्षिण कोरियाला २८ एप्रिलपासून निर्यात सुरू होणार आहे. निर्यातीत सर्वाधिक ६० टक्क्यांपर्यंत हापूसचा वाटा आहे. त्या खालोखाल केशर, बेगनपल्ली, बदामी आदी जातींच्या आंब्याचा समावेश आहे.**

यंदा राज्यात आंबा उत्पादन चांगले आहे. निर्यातक्षम दर्जाचा हापूस मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. निर्यातीत मोठी वाढ होण्याचा अंदाज होता. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने एकूण पाच हजार टन आंबा निर्यातीचे उद्दिष्ट ठेवले होते. पण ते गाठणे कठीण दिसत आहे. आतापर्यंत सुमारे १२०० टन आंबा निर्यात होणे अपेक्षित होते. पण यंदा २३ एप्रिलअखेर वाशी येथील निर्यात सुविधा केंद्रावरून फक्त ६२५ टन आंब्याची निर्यात झाली आहे. मागील वर्षी हापूसचे उत्पादन कमी असतानाही केवळ अमेरिकेला ८५० टन आंबानिर्यात झाली होती. निर्यात सुविधा आणि आंब्याची उपलब्धता चांगली असतानाही निर्यात घटली आहे. इस्रायल-पॅलेस्टाईन युद्धाचा मोठा फटका आंबा निर्यातीला बसत आहे.

वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीतील फळांचे व्यापारी संजय पानसरे म्हणाले, की यंदा अमेरिकेतून आंब्याला मोठी मागणी आहे. पण वाहतुकीत अडचणी येत आहेत. नाशवंत शेतमालाच्या निर्यातीला हवाई वाहतूक कंपन्यांकडून प्राधान्य मिळणे अपेक्षित असतानाही बिगरनाशवंत मालाच्या निर्यातीला प्राधान्य दिले जात आहे. राज्यात निर्यातक्षम आंब्याची उपलब्धता चांगली आहे. यामुळे निर्यातीला अधिक वाव आहे.

MAGZ

# अमेरिकन, युरोपही भारतीय आंब्याच्या प्रेमात

## विकिरण सुविधा केंद्रातून ६०२ टन आंब्याची निर्यात : बाजार समितीचेही प्रोत्साहन

**नामदेव मोरे**

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** भारतीय आंब्याला जगभरातून पसंती वाढू लागली आहे. आखाती देशांबरोबर अमेरिका, युकेसह अनेक प्रमुख देशांमध्ये हापूसची निर्यात सुरू झाली आहे. पणन मंडळाच्या नवी मुंबईमधील विकिरण सुविधा केंद्रातून आतापर्यंत ६०२ टन आंब्याची निर्यात झाली आहे. बाजार समितीनेही निर्यातदारांसाठी २४ तास मार्केट खुले



केले असून यावर्षी निर्यातीचा टक्का वाढण्याची शक्यता व्यापाऱ्यांनीही व्यक्त केली आहे.

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ८० हजार ते १ लाख पेट्यांची रोज आवक होत आहे. कोकण व दक्षिणेकडील राज्यांमधून येणारा आंबा मुंबई, ठाणे, नवी मुंबईतील स्थानिक मार्केटबरोबर विदेशातही पाठविला जात आहे. आंबा निर्यातीला पाठविताना निर्जंतुकीकरणाचे निकष काटेकोरपणे पाळावे लागतात. हॉट वॉटर ट्रीटमेंट व रेडिएशन करावे लागते. यासाठी पणन मंडळाने बाजार समितीजवळ विशेष विकिरण सुविधा केंद्र उभारले आहे.

"निर्यातीसाठी बाजार समितीने प्रोत्साहन देण्याची भूमिका घेतली आहे. निर्यातीच्या कामात अडथळा येऊ नये यासाठी निर्यातदारांना २४ तास बाजारपेठ खुली केली आहे.

**- संगीता अढांगळे, उपसचिव, फळ मार्केट**

### दररोज १० टन आंबा जातोय परदेशी

१. पणनच्या केंद्रातून रोज दहा टन आंबा निर्यात होत आहे. आतापर्यंत ऑस्ट्रेलिया व यूएसएला १९० टन, युकेला ४००, जपानला २, न्यूझीलंडला १० टन आंबा निर्यात झाला आहे.

२. याव्यतिरिक्त बाजार समितीमधील १५ निर्यातदारांच्या माध्यमातून आखाती व इतर देशांमध्ये मोठ्या प्रमाणात निर्यात सुरू आहे. बाजार समितीमध्ये आवक होणाऱ्या आंब्यापैकी जवळपास ६० टक्के मालाची निर्यात होत आहे.

"आंबा निर्यातीचे निकष काटेकोरपणे पाळले जातात. विकिरण प्रक्रियेसाठी पणन मंडळाने सुविधा उपलब्ध करून दिली आहे. विदेशातूनही चांगली मागणी आहे.

**- मोहन डोंगरे, निर्यातदार**

Sakal, Dt. 19/04/2024

# आंबा महोत्सवाकडे ग्राहकांचा ओघ

**मार्केट यार्ड, ता. १८ :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या आंबा महोत्सवाला यंदा चांगला प्रतिसाद मिळत आहे. ग्राहकांना कोकणातील दर्जेदार हापूस आंबा मिळत आहे.

दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' योजनेअंतर्गत मार्केट यार्डात आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यंदाही एक एप्रिलपासून महोत्सव सुरू आहे. यंदा महोत्सवाचे २३वे वर्ष आहे. कृषी पणन मंडळ पुणे आणि जिल्हा परिषदेच्या सहकार्याने आयोजन केले आहे. गुलटेकडी, मार्केट यार्ड येथील पीएमपी बस डेपो शेजारील जिल्हा परिषदेच्या मोकळ्या जागेत महोत्सव सुरू आहे. यामध्ये ९८ उत्पादकांना ६० स्टॉल उपलब्ध करून दिले आहेत. त्यात हापूस, केशर, पायरी आणि बिटकी (लहान) आंबा विक्री करण्यात येत आहे. कोकणातील हवामान चांगले राहिल्याने आंब्याची आवक चांगली आहे.




**मार्केट यार्ड :** 'जीआय' टॅग लावलेला आंबा ग्राहकांना विक्री केला जात आहे.

> “ पणन मंडळाच्या माध्यमातून उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव मिळत आहे. यंदा आंब्याचे उत्पन्न जास्त व दर्जा चांगला आहे.
>
> **- बाळकृष्ण मोंडे,**
> आंबा उत्पादक शेतकरी, सौंदाळे
> (ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग)

> “ कोकणातील हापूस आंब्याच्या दर्जामुळे नावलौकीक प्राप्त झाला आहे. दर्जामुळे आंब्याला पसंती आहे.
>
> **- मंगेश कदम,**
> सहायक सरव्यवस्थापक,
> महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ

**आंब्याचे भाव** वजनाप्रमाणे प्रतिडझन

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वजन (ग्रॅममध्ये) | ३०० पेक्षा जास्त | २७५ ते ३०० | २५० ते २७५ | २२५ ते २५० | २०० ते २२५ | १७५ ते १७५ | १७५ व कमी |
| दर (रुपयांत) | ९०० - १००० | ८००-९०० | ७००-८०० | ६००-७०० | ५००-६०० | ४५०-५०० | ४००-४५० |

पुढारी

पुढारी ANCHOR

# पणन मंडळाचे पाच हजार टन आंबा निर्यातीचे उद्दिष्ट

## ४२५ टन निर्यात पूर्ण; पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांची माहिती

**किशोर बरकाले**

**पुणे : राज्य कृषी पणन मंडळाच्या विविध ठिकाणच्या निर्यात सुविधांच्या वापरातून गतवर्षी ३ हजार ५०० टन आंब्यांची निर्यात करण्यात आली असून, चालू वर्षीच्या समुद्रमार्गे निर्यातीचे उद्दिष्ट व नियोजन सुमारे पाच हजार टनाइतके निश्चित करण्यात आले आहे. या सर्व सुविधांवरून मॅगोनेट या ऑनलाइन प्रणालीवरील नोंदणीकृत बागांमधीलच आंबा निर्यात केला जाणार असल्याची माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली. सध्या अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोप, इंग्लंडमध्ये ४२५ टन आंबा निर्यात पूर्ण झाल्याचेही त्यांनी सांगितले.**

वाशी येथील विकिरण सुविधा केंद्रावरून अमेरिकेस ८०० टन, ऑस्ट्रेलियास २०० टन, व्हेपर हीट ट्रीटमेंटचा वापरातून युरोप, न्यूझिलंड, जपान, दक्षिण कोरिया येथे ३५० टन, भाजीपाला प्रक्रिया केंद्रातील सुविधांचा वापर करून इंग्लंड व युरोपमध्ये ३ हजार टन



**पणन मंडळाच्या वाशी येथील सुविधा केंद्रांवर निर्यातीपूर्वी आंब्यांची तपासणी, प्रक्रिया व आकर्षक पॅकिंग केले जाते.**

तसेच बारामती सुविधा केंद्रांवरून इंग्लंड, अमेरिका व युरोपमध्ये १ हजार टन आंबा निर्यातीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. आंब्याच्या शेतकऱ्यांसह निर्यातदारांनाही परदेशी बाजारपेठ उपलब्ध होऊन चांगला दर मिळण्यासाठी पणन मंडळ प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

देशातून दरवर्षी आंब्याची सुमारे २५ हजार टनाइतकी निर्यात होते. त्यामध्ये महाराष्ट्रातील हापूस, केशर, राजापुरी तर अन्य राज्यांमधून प्रामुख्याने बैंगनपल्ली, हिमायत, दशहरी, चौसा या जातींचा आंब्याचा समावेश आहे. कृषीमाल निर्यातीसाठी पणन मंडळाने राज्यात एकूण ४५ निर्यात सुविधा केंद्रे उभारली आहेत. जगामध्ये कोणत्या देशास आंबा निर्यात करावयाचा असल्यास त्या देशाच्या मागणीनुसार आंब्यावर प्रक्रिया करून तो पाठविला जातो

### आंबा निर्यातीसाठी नेमक्या कोणत्या प्रक्रिया कराव्या लागतात

**वाशी येथील व्हेपर हीट ट्रीटमेंट म्हणजेच बाष्प प्रक्रिया सुविधा (व्ही.एच.टी.)**

आंबा फळमाशी विरहित करण्यासाठीची व्हेपर हीट ट्रीटमेंट ही प्रक्रिया पद्धत वापरली जाते. जपान, न्यूझिलंड, युरोपियन देश, दक्षिण कोरिया, मॉरिशस इत्यादी देशांना आंबा निर्यातीकरिता व्हीएचटी ही प्रक्रिया करावी लागते. त्यामध्ये आंब्यावर ठराविक तापमानाला (४७.५ डिग्री सेल्सिअसमध्ये २० मिनिटे) पाण्याच्या बाष्पाचा मारा केला जातो. जेणेकरून आंब्यामधील फळमाशीचे निर्मूलन होते.

**विकिरण सुविधा**

अमेरिका, ऑस्ट्रेलिया, मलेशिया व अर्जेंटिना या देशात आंबा निर्यातीकरिता प्रामुख्याने आंब्याचे निर्जंतुकीकरण व साठवण क्षमता वाढविण्यासाठी आंब्यावर विकीरण प्रक्रिया केली जाते. या सुविधेतून कोबाल्ट - ६० किरणांचा विकिरणासाठी वापर केला जातो. विकीरण ही उष्णता व रसायनविरहीत प्रक्रिया असल्याने अन्नपदार्थाच्या मूळ गुणधर्मामध्ये कोणतेही बदल होत नाहीत.

**उष्णजल तथा हॉट वॉटर ट्रीटमेंट**

वाशी येथील हॉट वॉटर ट्रीटमेंट अर्थातच उष्णजल प्रक्रिया केंद्राच्या सुविधेंचा वापर करून युरोपियन युनियन, इराण, रशिया इत्यादी देशात आंबा निर्यात केला जातो. तसेच अमेरिका, ऑस्ट्रेलिया येथील निर्यातीकरिता आवश्यक असलेली विकिरण प्रक्रिया करण्यापूर्वी करावयाची ५२ डिग्री सेल्सिअस तापमानात ३ मिनिटांची प्रक्रिया आंब्यांवर केली जाते. त्यामुळे आंब्यांच्या कोयीमधील फळमाशी मरते.

My Gramin Edition
Apr 12, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

पुढारी
www.pudhari.com

# राज्यातील सात उत्पादनांना जीआय मानांकन

## नाबार्डचे सहकार्य : हिंगोली, नंदुरबार, कोल्हापूर, सांगली व सिंधुदुर्ग जिल्ह्यांचा समावेश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील सात उत्पादनांना केंद्र सरकारचे भौगोलिक मानांकन तथा जीआय मिळण्यासाठी राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेच्या (नाबार्ड) महाराष्ट्र प्रादेशिक कार्यालयाने विशेषतः या प्रक्रियेतील नोंदणीसाठी सहकार्य केलेले आहे. त्यासाठी या अद्वितीय उत्पादनांची वैशिष्ट्ये जतन करण्यासाठी 'नाबार्ड'ने वाराणसीमधील मानव कल्याण संघाची मदत घेतल्याची माहिती कळविण्यात आली आहे.

या सात जीआय मानांकन उत्पादनांमध्ये वसमत हळदी (हिंगोली), नंदुरबार आमचूर, नंदुरबार मिरची, हुपरी सिल्व्हर क्राफ्ट (कोल्हापूर), मिरज तानपुरा (सांगली), मिरज सतार (सांगली) आणि सावंतवाडी लाकडी क्राफ्ट (सिंधुदुर्ग) ही महाराष्ट्रातील अद्वितीय उत्पादने आहेत. भौगोलिक मानांकनप्राप्त उत्पादने ही त्या त्या विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील असतात. ज्यांचे एखाद्या विशिष्ट स्थानाचे गुण, प्रतिष्ठा किंवा वैशिष्ट्यांचा अंतर्भाव त्या वस्तूंमध्ये राहतो आणि त्याचे वेगळेपण जीआयमुळे अधोरेखित होते. खाद्यपदार्थ म्हणजे वसमत हळदी, सुका आंबा आणि मिरची त्याचा अद्वितीय रंग, सुगंध आणि चव या प्रदेशाच्या भौगोलिक परिस्थितीमुळे आहे. इतर चार उत्पादन क्षेत्रे ग्रामीण कारागिरांनी बनवलेल्या या पारंपरिक वस्तू आहेत.



### सावंतवाडीची प्रसिद्ध लाकडी खेळणी

सावंतवाडीच्या प्रसिध्द लाकडी खेळण्यांना भारत सरकारचे जी.आय. भौगोलिक मानांकन प्राप्त झाले आहे, अशी माहिती सुतार समाज हस्तकला प्रोड्युसर कंपनीचे अध्यक्ष आनंद मेस्त्री यांनी राजवाडा येथे आयेजित पत्रकार परिषदेत दिली. मेस्त्री म्हणाले, सावंतवाडी शहरातील लाकडी खेळण्यांचा उल्लेख जुन्या पाठ्यपुस्तकांमध्ये आढळला आहे. त्यामध्ये सावंतवाडीतील लाकडी खेळणीचे महत्त्व सांगितले आहे.

पुढारी
पुढारी ANCHOR

# राज्यातील सात उत्पादनांच्या जीआय नोंदणीत नाबार्डचे सहकार्य

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**
**महाराष्ट्रातील सात उत्पादनांना केंद्र सरकारचे भौगोलिक मानांकन तथा जीआय मिळण्यासाठी राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेच्या (नाबार्ड) महाराष्ट्र प्रादेशिक कार्यालयाने विशेषत: या प्रक्रियेतील नोंदणीसाठी सहकार्य केलेले आहे. त्यासाठी या अद्वितीय उत्पादनांची वैशिष्ट्ये जतन करण्यासाठी नाबार्डने वाराणसीमधील मानव कल्याण संघाची मदत घेतल्याची माहिती कळविण्यात आली आहे.**



- **वाराणसीमधील मानव कल्याण संघाची मदत**
- **हिंगोली, नंदुरबार, कोल्हापूर, सांगली व सिंधुदुर्ग जिल्ह्यांचा समावेश**

त्याद्वारे महाराष्ट्रातील सात स्वदेशी उपादनांना जीआय नोंदणीसाठी नाबार्डकडून मदत करण्यात आली आहे. या सात जीआय मानांकन उत्पादनामध्ये वसमत हळदी (हिंगोली), नंदुरबार आमचूर, नंदुरबार मिर्ची, हुपरी सिल्व्हर क्राफ्ट (कोल्हापूर), मिरज तानपुरा (सांगली), मिरज सतार (सांगली) आणि सावंतवाडी लाकडीक्राफ्ट (सिंधुदुर्ग) ही महाराष्ट्रातील अद्वितीय उत्पादने आहेत.

भौगोलिक मानांकनप्राप्त उत्पादने ही त्या- त्या विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील असतात. ज्यांचे एखाद्या विशिष्ट स्थानाचे गुण, प्रतिष्ठा किंवा वैशिष्ट्यांचा अंतर्भाव त्या वस्तूंमध्ये राहतो आणि त्याचे वेगळेपण जीआयमुळे अधोरेखित होते.

खाद्यपदार्थ म्हणजे वसमत हळदी, सुका आंबा आणि मिरची त्याचा अद्वितीय रंग, सुगंध आणि चव या प्रदेशाच्या भौगोलिक परिस्थितीमुळे आहे. इतर चार उत्पादन क्षेत्रे ग्रामीण कारागिरांनी बनवलेल्या या पारंपरिक वस्तू असल्याचेही नाबार्डकडून कळविण्यात आले आहे.

प्रचंड खपाचे एकमेव विश्वास व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# पणन मंडळाच्या सुविधांवरून पाच हजार टन आंबा निर्यातीचे उद्दिष्ट

## ४२५ टन निर्यात पूर्ण; पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांची माहिती

**पुढारी वॉच**

किशोर बरकाले
पुढारी प्रतिनिधी



**पणन मंडळाच्या वाशी येथील सुविधा केंद्रांवर निर्यातीपूर्वी आंब्यांची तपासणी, प्रक्रिया व आकर्षक पॅकिंग केले जाते.**

**पुणे :** राज्य कृषी पणन मंडळाच्या विविध ठिकाणच्या निर्यात सुविधांच्या वापरातून गतवर्षी ३ हजार ५०० टन आंब्यांची निर्यात करण्यात आली असून, चालू वर्षीच्या समुद्रमार्गे निर्यातीचे उद्दिष्ट व नियोजन सुमारे पाच हजार टनाइतके निश्चित करण्यात आले आहे. या सर्व सुविधांवरून मॅगोनेट या ऑनलाइन प्रणालीवरील नोंदणीकृत बागांमधीलच आंबा निर्यात केला जाणार असल्याची माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली. सध्या अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोप, इंग्लंडमध्ये ४२५ टन आंबा निर्यात पूर्ण झाल्याचेही त्यांनी सांगितले.

### वाशी येथील व्हेपर हीट ट्रीटमेंट

आंबा फळमाशी विरहित करण्यासाठीची व्हेपर हीट ट्रीटमेंट ही प्रक्रिया पद्धत वापरली जाते. जपान, न्यूझिलंड, युरोपियन देश, दक्षिण कोरिया, मॉरिशस इत्यादी देशांना आंबा निर्यातीकरिता व्हीएचटी ही प्रक्रिया करावी लागते. त्यामध्ये आंब्यावर ठराविक तापमानाला (४७.५ डिग्री सेल्सिअसमध्ये २० मिनिटे) पाण्याच्या बाष्पाचा मारा केला जातो. जेणेकरून आंब्यामधील फळमाशीचे निर्मूलन होते.

### वाशी येथील विकिरण सुविधा

अमेरिका, ऑस्ट्रेलिया, मलेशिया व अर्जेंटिना या देशात आंबा निर्यातीकरिता प्रामुख्याने आंब्याचे निर्जंतुकीकरण व साठवण क्षमता वाढविण्यासाठी आंब्यावर विकीरण प्रक्रिया केली जाते. या सुविधेतून कोबाल्ट - ६० किरणांचा विकिरणासाठी वापर केला जातो. विकीरण ही उष्णता व रसायनविरहीत प्रक्रिया असल्याने अन्नपदार्थांच्या मूळ गुणधर्मामध्ये कोणतेही बदल होत नाहीत.

### उष्णजल तथा हॉट वॉटर ट्रीटमेंट

वाशी येथील हॉट वॉटर ट्रीटमेंट अर्थातच उष्णजल प्रक्रिया केंद्राच्या सुविधेंचा वापर करून युरोपियन युनियन, इराण, रशिया इत्यादी देशात आंबा निर्यात केला जातो. तसेच अमेरिका, ऑस्ट्रेलिया येथील निर्यातीकरिता आवश्यक असलेली विकिरण प्रक्रिया करण्यापूर्वी करावयाची ५२ डिग्री सेल्सिअस तापमानात ३ मिनिटांची प्रक्रिया आंब्यांवर केली जाते. त्यामुळे आंब्यांच्या कोयीमधील फळमाशी मरते.

वाशी येथील विकिरण सुविधा केंद्रावरून अमेरिकेस ८०० टन, ऑस्ट्रेलियास २०० टन, व्हेपर हीट ट्रीटमेंटचा वापरातून युरोप, न्यूझिलंड, जपान, दक्षिण कोरिया येथे ३५० टन, भाजीपाला प्रक्रिया केंद्रातील सुविधांचा वापर करून इंग्लंड व युरोपमध्ये ३ हजार टन तसेच बारामती सुविधा केंद्रांवरून इंग्लंड, अमेरिका व युरोपमध्ये १ हजार टन आंबा निर्यातीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. शेतकऱ्यांसह निर्यातदारांनाही परदेशी बाजारपेठ उपलब्ध होऊन चांगला दर मिळण्यासाठी पणन मंडळ प्रयत्नशील असल्याचे सांगितले. दरवर्षी आंब्याची सुमारे २५ हजार टनाइतकी निर्यात होते.

My Pune Edition
Apr 7, 2024 Page No. 06
Powered by: erelego.com

पुढारी

# आवक वाढल्याने हापूस आंब्यांचे दर उतरले

## पणन मंडळाच्या आंबा महोत्सवात डझनामागे १०० ते १५० रुपयांनी घट

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत सुरू झालेल्या 'शेतकरी ते ग्राहक थेट विक्री' योजनेअंतर्गतच्या आंबा महोत्सवात आवक वाढल्याने प्रतिडझनाचे भाव १०० ते १५० रुपयांनी उतरले. रत्नागिरी हापूस आंब्यांचा प्रतिडझनाचा दर मालाच्या दर्जानुसार ५०० ते ९०० रुपये तर कोकण पायरीचा दर ७०० ते ८०० रुपये आहे. तर गुढीपाडवा सणाच्या पार्श्वभूमीवर घटलेल्या दरात ग्राहकांनी दर्जेदार हापूस आंबा खरेदी करण्याचे आवाहन पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी केले आहे.

**रत्नागिरी हापूसचा डझनाचा दर ५०० ते ९०० रुपये, पायरी ७०० ते ८०० रुपये**






पणन मंडळाच्या आंबा महोत्सवात शेतकऱ्यांकडून थेट आंबा खरेदीस प्रतिसाद चांगला मिळत आहे.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' योजनेअंतर्गत मार्केट यार्डात सुरू असलेल्या आंबा महोत्सवाचे यंदाचे २३ वे वर्ष आहे. पणन मंडळ व पुणे जिल्हा परिषदेच्या सहकार्याने मार्केट यार्डातील पीएमटी बस डेपोशेजारील जिल्हा परिषदेच्या मोकळ्या जागेत १ एप्रिलपासून आंबा महोत्सवास सुरुवात झाली आहे. यंदा कोकणच्या विविध भागातून आलेले ९४ आंबा उत्पादकांकडून सुमारे ६० स्टॉलवर आंबा विक्री सुरू आहे. महोत्सवात तयार हापूस आंब्यांची उपलब्धता वाढली असून देवगड हापूसचा प्रतिडझनाचा दर ६०० ते ११०० रुपये आहे.

कोकणातील आंबा उत्पादकांबरोबरच सोलापूर जिल्ह्यातील केशर आंबा उत्पादक आणि पुणे जिल्हा परिषदेकडील ग्रामिण विकास यंत्रणा विभागाकडील महिला बचत गटांमार्फत उत्पादित विविध उत्पादनांची विक्रीही सुरू आहे. पहिल्या ४ दिवसांमध्ये सुमारे ५ हजार डझन आंबा विक्री करण्यात आली. गतवर्षी हीच विक्री ३ हजार २०० डझनाइतकी झाली होती. गुढीपाडव्याच्या सणामुळे पुढील ३ दिवसांत सुमारे तीन हजार हापूस आंब्यांच्या पेटींची आवक अपेक्षित असल्याची माहिती पणनचे देशांतर्गत व्यापार विभागाचे प्रमुख मंगेश कदम यांनी दिली.

मुंबई तरुण भारत
Pune Edition | 2024-04-03 | Page- 2
epaper.mahamtb.com

# कोकणच्या हापूसचे पुण्यात दमदार आगमन

## कोकणातील हापूस वाजवी दरात : थेट ग्राहकांना आंबा विक्री सुरू

**पुणे, दि. २ : प्रतिनिधी**

उन्हाळ्याचा सीझन आला की, पुणेकरांना कोकणातील दर्जेदार हापूस आंब्यांची प्रतीक्षा असते. यंदा मागीलवर्षीच्या तुलनेत हापूस आंब्यांची जोरदार आवक झाली आहे. हा आंबा खरेदी करण्यासाठी मार्केट यार्डमध्ये पणन विभागाने विशेष सुविधा उपलब्ध करून दिल्याची माहिती पणनचे व्यापार विभागाचे समन्वयक मंगेश कदम यांनी दिली.

नैसर्गिक पद्धतीने पिकविलेला आंबा थेट शेतकऱ्यांकडून खरेदी करता येणार आहे. जास्तीत जास्त ग्राहकांनी महोत्सवास भेट देऊन आंबा खरेदी करण्याचे आवाहन राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी केले.



मार्केट यार्डातील पीएमटी बस डेपोशेजारील जिल्हा परिषदेच्या मोकळ्या जागेत पणनच्या आंबा महोत्सवाला सुरुवात झाली. याप्रसंगी कदम यांनी आंबा विक्रीच्या स्टॉलला भेटी देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे, देशांतर्गत व्यापार विभागाचे समन्वयक मंगेश कदम, आनंद शुक्ल आणि मॅग्नेट प्रकल्पाचे अधिकारी अमोल यादव उपस्थित होते.

शेतकरी ते ग्राहक अशी आंब्यांची थेट विक्रि दि. १ एप्रिल ते ३१ मेपर्यंत सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. हे आंबे प्रतिडझनाला रत्नागिरी हापूस ५०० ते १००० रुपये, देवगड ७०० ते १२०० रुपये, बिटकी (लहान आंबा) १५० ते २०० रुपये, तर कोकण पायरी आंब्यांची ७०० ते ८०० रुपये या दराने विक्री केले जात आहेत.

### जोरदार प्रतिसाद

“मार्केट यार्ड परिसरात सुरू झालेल्या या कोकणच्या हापूस आंबा महोत्सवास जोरदार प्रतिसाद मिळत आहे.

**– मंगेश कदम,**
समन्वयक पणन

## बाजारपेठांत भारतीय संस्कृतीचे दर्शन

आगामी आठवड्यात येऊ घातलेला हिंदूंचा महत्त्वाचा सण म्हणजे गुढीपाडवा. शिवाय लग्नसराईचा मोसम असल्याने त्यासाठी बाजारपेठांत विविध आवश्यक वस्तू, पदार्थ, साहित्याची आवक सुरू झाली असून उन्हाळा असल्याने मातीच्या भांड्यांनादेखील ग्राहकांची मागणी असल्याचे निदर्शनास आले आहे. शिवाय हापूस आंब्यांसह अन्य प्रकारचे आंबे आणि कलिंगड आणि खरबूजांची आवक वाढली आहे. एकूणच बाजारपेठा आता भारतीय संस्कृतीची शोभा वाढविणाऱ्या वस्तूंनी सजल्या असून ग्राहकांचा त्याकडेच ओढा वाढला आहे.

पाडव्यासाठी गाठ्यादेखील भरपूर प्रमाणात बाजारात उपलब्ध झाल्या असून विविध प्रकारची भारतीय मिठाई तयार केली जात असून विशेषतः यंदा बासुंदीला अधिक मागणी असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले आहे.

एकूणच भारतीय परंपरेला साजेशी वस्त्र दालने आणि दागिण्यांच्या दुकानातून अशाच दागिन्यांना पसंती मिळत असल्याचे चित्र आहे.

सहसा आजकाल उन्हाळ्यात शीतल पाण्यासाठी आधुनिक काळातील साधने वापरण्याचा ट्रेंड बघायला मिळतो. मात्र, यंदा मातीच्या माठांना मागणी असल्याचे अशा दुकानांवर गर्दी असल्याचे चित्र दिसत आहेत. उन्हाचा तडाखा वाढल्यामुळे पुणेकरांनी मातीची भांडी खरेदी करण्यास सुरुवात केली आहे. पाणी थंड राहत असल्याने मातीने बनवलेल्या पाण्याच्या बाटल्यांची विक्री वाढल्याचे विक्रेते सांगतात.

कुंभारवाड्यातील व्यावसायिकांनी याबाबत बोलताना सांगितले की, मातीच्या भांड्यांना मागणी वाढली आहे. विशेष म्हणजे आता मातीच्या पाण्याच्या बाटल्या उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

Powered by iDocuments

Agrowon, Dt. 03/04/2024

# कृषी पणन मंडळाचा आंबा महोत्सव सुरू

## महोत्सवात अस्सल हापूस, पायरी आणि केशर आंबा विक्रीस

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : ग्राहकांना अस्सल कोकणचा हापूस आंबा रास्त दरात उपलब्ध होण्यासाठी उत्पादक ते ग्राहक या संकल्पनेवरील राज्य कृषी पणन मंडळाच्या २३ व्या हापूस आंबा महोत्सवाला सोमवारपासून (१ एप्रिल) प्रारंभ झाला. हापूस आंब्याचा हंगाम बहरात आला असून, महोत्सवाच्या निमित्ताने कोकणातील शेतकऱ्यांनी आपला अस्सल आंबा विक्रीस आणला आहे. यंदा आंबा मुबलक असल्याने दर देखील रास्त असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

राज्य कृषी पणन मंडळासह पुणे जिल्हा परिषदेच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या महोत्सवात रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यांतील तसेच राज्यातील केशर आंबा उपलब्ध झाला आहे. ग्रामीण विकास यंत्रणा विभागाकडील काही महिला बचत गटांचाही महोत्सवात सामावेश आहे. या बचत गटाकडून आंब्यासह अस्सल ग्रामीण पदार्थ देखील उपलब्ध आहेत. महोत्सवात सुमारे १२५ स्टॉल असून, मार्केट यार्ड

**“ माझी २ हजार ५०० झाडे असून, या वर्षी हवामानाने साथ दिल्याने गेल्या वर्षीच्या तुलनेत २५ टक्के आंबा जास्त आहे. पहिल्या मोहोराला थ्रिप्सचा प्रादुर्भाव झाल्याने काही प्रमाणात कमी फळ लागली तर उन्हाळा जास्त असल्याने आंबा भाजत असून, डागी आंबा जास्त आहे. त्यामुळे पेटीतही आंबा भाजत असल्याने काही प्रमाणात आंबा खराब होण्याचे प्रमाण आहे. गेल्या वर्षी आंबा कमी असल्याने ४-५-६ डझनच्या पेटीचा दर ५ ते ६ हजार रुपये तेच दर या वर्षी ४ ते ४ हजार ५०० रुपये एवढे आहेत.**

**– विपुल गोंणबरे,** परचुरी, ता. संगमेश्वर - (संपर्क - ९१११९५६२४०५)

**– सुभाष लांजेकर,** फुंणगूस, ता. संगमेश्वर (संपर्क - ९७६७६४९०६६)

येथील पीएमटी बस डेपो शेजारील जिल्हा परिषदेच्या मोकळ्या जागेत महोत्सव सुरू झाला आहे.



**पुणे : राज्य कृषी पणन मंडळाच्या आंबा महोत्सवात मंगळवारी (ता.२) आंबा खरेदीसाठी आलेले कुटुंब**

### यंदा मुबलक हापूस

गेल्या वर्षी हवामान बदल, अवकाळी पाऊस आदी विविध कारणांनी आंब्याचे उत्पादन घटले होते. तर ऐन अक्षय तृतीयेला आंब्याची टंचाई निर्माण झाली होती. मात्र या वर्षी हवामानाने साथ दिल्याने आंबा मुबलक उपलब्ध असल्याने ग्राहकांनी जास्तीत जास्त आंबा खरेदी करण्याचे आवाहन पणन मंडळाचे कार्यकारी संचालक कदम यांनी केले आहे.

सकाळ

# हापूस, केशर, पायरी कमी दरात आणा घरी

## कृषी पणन मंडळाचा आंबा महोत्सव सुरू

**मार्केट यार्ड, ता. १ :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' योजनेअंतर्गत आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या अनुषंगाने सोमवारपासून (ता. १) गुलटेकडी, मार्केट यार्ड येथील पीएमपी बसडेपो शेजारील जिल्हा परिषदेच्या मोकळ्या जागेत आंबा महोत्सवास सुरुवात झाली.



या वर्षी पणन मंडळाच्या आंबा महोत्सवाचे २३ वे वर्ष आहे. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थ वगळून शेतक-यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा आंबा मिळावा, या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. चालू वर्षी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे व पुणे जिल्हा परिषद यांच्या सहकार्याने उपक्रम राबविला जात आहे.

महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड जिल्हा, तसेच राज्यातील केशर आंबा उत्पादकांबरोबरच जिल्हा परिषदेकडील ग्रामिण विकास यंत्रणा विभागाकडील काही महिला बचत गटांचाही सामावेश आहे.

महोत्सवात ६० स्टॉल असून, ९५ उत्पादक हापूस, केशर, पायरी, बिटकी (लहान आंबा) आंबा विक्री करणार आहेत, तसेच १०

बचत गटांच्या स्टॉलमधून विविध प्रक्रियायुक्त उत्पादने खरेदीची संधी लाभणार आहे.

Pune, Main
02/04/2024 Page No. 3

Pudhari, Dt. 02/04/2024

# कोकणातील दर्जेदार हापूस वाजवी दरात खरेदी करा

- पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांचे आवाहन
- मार्केट यार्डात शेतकऱ्यांकडून थेट ग्राहकांना आंबा विक्री सुरू

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

कोकणातील दर्जेदार हापूस आंबा वाजवी दरात खरेदी करण्याची संधी पुणेकर ग्राहकांना उपलब्ध झालेली आहे. शिवाय नैसर्गिक पद्धतीने पिकविलेला आंबा थेट शेतकऱ्यांकडून खरेदी करता येणार आहे. जास्तीत जास्त ग्राहकांनी महोत्सवास भेट देऊन आंबा खरेदी करण्याचे आवाहन राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी केले.

मार्केट यार्डातील पीएमटी बस डेपोशेजारील जिल्हा परिषदेच्या मोकळ्या जागेत पणनच्या आंबा महोत्सवाला सोमवारी (दि. १) सुरुवात झाली. याप्रसंगी कदम यांनी आंबा विक्रीच्या स्टॉलला भेटी देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे, देशांतर्गत व्यापार विभागाचे समन्वयक मंगेश कदम, आनंद शुक्ल आणि मॅग्नेट प्रकल्पाचे अधिकारी



आंबा विक्रीच्या स्टॉलला भेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधताना संजय कदम, विनायक कोकरे, अमोल यादव.

अमोल यादव उपस्थित होते.

शेतकरी ते ग्राहक अशी आंब्यांची थेट विक्री १ एप्रिल ते ३१ मेपर्यंत सकाळी नऊ ते रात्री नऊपर्यंत सुरू राहणार आहे. तयार आंब्यांच्या (पिकलेला) खरेदीसाठी ग्राहकांनी पहिल्याच दिवशी गर्दी केल्याचे चित्र दिसून आले. प्रतिडझनाला रत्नागिरी हापूस ५०० ते १००० रुपये, देवगड ७०० ते १२०० रुपये, बिटकी (लहान आंबा) १५० ते २०० रुपये, तर कोकण पायरी आंब्यांची ७०० ते ८०० रुपये या दराने विक्री झाली.

Lokmat, Dt. 02/04/2024

महोत्सवात कोकण आणि विविध भागांतील शेतकरी सहभागी

# मार्केट यार्ड येथे भरला आंबा महोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : चोखंदळ पुणेकरांची फसवणूक टाळावी आणि वाजवी दरात अस्सल देवगड हापूसचा आस्वाद घेता यावा, या उद्देशाने मार्केटयार्ड येथे आंबा महोत्सव सुरू करण्यात आले आहे. पणन मंडळाकडून आयोजित या आंबा महोत्सवात कोकण आणि विविध भागांतील शेतकरी आणि आंबा उत्पादक सहभागी होत आहेत. यामुळे पुणेकरांना थेट शेतकऱ्यांकडून कमी दरात आंबा खरेदीची सुवर्णसंधी मिळणार आहे.

मार्केट यार्ड पुणे येथे विठ्ठलराव विखे पाटील सहकारी प्रबंध संस्थान पुणे आणि देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्था मर्यादित जामसंडे (ता. देवगड) यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी ते ग्राहक थेट विक्री या योजनेखाली दि. १ एप्रिलपासून महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे छात्रावास इमारतीच्या आवारात आंबा महोत्सवाचे आयोजन केले आहे. आंब्याचा हंगाम सुरू असून, मोठ्या प्रमाणावर आंब्याची आवक होताना दिसत आहे.

पुणेकरांनी आंबा महोत्सवाला भेट देऊन उत्तम प्रतिचे, गोड, सुमधुर अस्सल देवगड हापूस आंबे खरेदी करावे, असे आवाहन आंबा महोत्सवातील स्टॉलधारक आंबा उत्पादक शेतकरी रामचंद्र करंदीकर, पराशय मोंडे, प्रथमेश देवळेकर व शैलेश घाडगे यांचे मार्फत करण्यात येत आहे.





मार्केट यार्ड येथे आंबा महोत्सवात झालेली आंब्यांची आवक.

Agrowon, Dt. 01/04/2024

# ‘वसमत हळद’ नावाने मिळाले ‘जीआय’ मानांकन

## केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्रालयाकडून अधिसूचना प्रसिद्ध

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

हिंगोली : जिल्ह्यातील हळदीला ‘वसमत हळद’ या नावाने भौगोलिक मानांकन (ज़िओग्राफिकल इंडिकेशन : जी.आय.) प्राप्त झाले आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या उद्योग प्रोत्साहन आणि अंतर्गत व्यापार विभागाच्या अंतर्गत भौगोलिक संकेत (जी. आय.) विभागाने शनिवारी (ता. ३०) अधिसूचना प्रसिद्ध केली असून, त्यानुसार क्लास ३१ मध्ये ‘वसमत हळद’ची (टर्मरिक) नोंद करण्यात आलेली आहे.

जी.आय. मानांकनामुळे हिंगोलीसह परभणी, नांदेड, वाशीम, अकोला या जिल्ह्यांतील हळदीची जगभरात स्वतंत्र ओळख निर्माण होईल, अशी माहिती नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक एस. के. नवसारे यांनी दिली. पान ४ वर »

### पाच जिल्ह्यांकरिता ‘जीआय’ मानांकन

हिंगोली, नांदेड, परभणी, वाशीम व अकोला या जिल्ह्यांकरिता ‘वसमत हळद’ (टर्मरिक) या नावाने भौगोलिक मानांकनाचा दर्जा दिलेला आहे. राज्यातील सांगली व वायगाव हळदीनंतर ‘वसमत हळद’ हा भौगोलिक मानांकनाचा टॅग प्राप्त झालेला आहे, असे नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक एस. के. नवसारे यांनी सांगितले.

## ‘वसमत हळद’ नावाने मिळाले ‘जीआय’ मानांकन

» पान १ वरून

हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे हळद पारंपरिक पीक आहे. गुणवत्तेच्या बाबतीत या जिल्ह्यातील विशेषतः वसमत तालुक्यातील हळद वैशिष्ट्यपूर्ण आहे. अलीकडील काही वर्षांत हळद हे हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे प्रमुख नगदी पीक झाले. हळदीच्या क्षेत्राचा जिल्हाभरात विस्तार झाला. त्यामुळे देशभरात हळदीचा जिल्हा अशी हिंगोलीची ओळख निर्माण झाली. जिल्ह्यातील हळदीला भौगोलिक मानांकन मिळण्यासाठी विविध स्तरांवरून प्रयत्न केले जात होते. राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड)च्या अर्थ साहाय्याने वसमत तालुक्यातील हळदीला जी.आय. मानांकनासाठी ता.२० ऑक्टोबर २०२१ रोजी वसमत तालुक्यातील कुरुंदा येथील कुरुंदकर फार्मर्स प्रोड्यूसर्स कंपनी व सातेफळ येथील सूर्या फार्मर्स प्रोड्यूसर्स कंपनी या शेतकरी उत्पादक कंपन्यांनी वाराणसी येथील ह्यूमन वेल्फेअरचे सेक्रेटरी डॉ. रजनीकांत जनरल स्टेशन यांच्याद्वारे चेन्नई येथील भौगोलिक मानांकन नोंदणी कार्यालय येथे अर्ज (क्रमांक ७८५)सादर करण्यात आला होता. निकष पूर्ण केल्यामुळे हिंगोली जिल्ह्यातील हळदीला आता ‘वसमत हळद’ या नावाने जी.आय. (भौगोलिक मानांकन) प्राप्त झाले आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या उद्योग प्रोत्साहन आणि अंतर्गत व्यापार विभागाच्या अंतर्गत भौगोलिक संकेत (जी.आय.) विभागाने शनिवारी (ता. ३०) प्रसिद्ध केलेल्या यादीत हिंगोली जिल्ह्यातील ‘वसमत हळद’चा समावेश आहे.

मराठवाड्यातील हळदी उत्पादक शेतकरी व शेतकरी उत्पादक कंपन्या, तसेच वसमत येथे स्थापन झालेल्या बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून तज्ज्ञांनी सातत्याने केलेल्या प्रयत्नांमुळे ‘वसमत हळद’ या नावाने मराठवाड्यातील हळदीला भौगोलिक मानांकनाचा दर्जा मिळालेला आहे.

या जी. आय. प्रमाणपत्राची मुदत ३१ ऑक्टोबर २०३१ अशी आहे. जिल्ह्यातील हळद उत्पादक शेतकऱ्यांनी जीआय टॅगचा वापर करून मार्केटिंग करण्याकरिता अधिकृत वापरासाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. त्याकरिता हळद उत्पादक शेतकरी कंपन्यांनी पुढाकार घेऊन खास मोहीम राबवून अधिक वापर करण्याकरिता परत भौगोलिक मानांकन नोंदणी कार्यालयाकडे अर्ज करणे आवश्यक आहे.याबद्दल सर्व हळद उत्पादक शेतकऱ्यांचे व उत्पादक कंपन्याचे अभिनंदन केले जात आहे, असे सूर्या फार्मर्स प्रोड्युसर कंपनीचे अध्यक्ष प्रल्हाद बोरगड यांनी दिली.